# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-2557266/46
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in


क्र.तंशिस/प्राकाना/शैवि-1/ 2020/ 1369 दिनांक:- 03 JUL 2020

प्रति,

कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वि.का., नागपूर
प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित
पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था तसेच सर्व स्वायत्त संस्था, नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- नागपूर विभागातंर्गत सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या पदवी/पदव्युत्तर पदवी/पदवीका संस्था, विद्यापीठ यामधील अंतीम सत्र/अंतीम वर्षाच्या पदवी/पदव्युत्तर पदवी/पदवीका परीक्षांचे नियोजनबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. 19/06/2020 च्या शासन निर्णयाची अमलबजावधी करण्याबाबत.

संदर्भ:- 1. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण2020/प्र.क्र.123/ विशि-3, दि. 19 जुन 2020
२. मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, म.रा., मुंबई यांची दि. 30 जुन 2020 रोजी विडीओ कॉन्फरन्स व्दारे घेतलेली बैठक
३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दि. 02/07/2020 रोजी विडीओ कॉन्फरन्स व्दारे घेतलेली बैठक

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, कोव्हीड-19 या जागतीक महामारीच्या प्रादुर्भावाने उद्‌भवलेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर नागपूर विभागातील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या पदवी/पदव्युत्तर पदवी/पदवीका संस्था, विद्यापीठे यामधील अंतीम सत्र/अंतीम वर्षाच्या पदवी/पदव्युत्तर पदवी/पदवीका परीक्षांचे नियोजन करण्याबाबत शासनाने संदर्भ क्र. 1 अन्व्ये शासन निर्णय जाहीर केलेला आहे, या अनुषंगाने सदर शासन निर्णयातील बाब 'अ' व 'ब' प्रमाणे कार्यवाही करावी.

शासन निर्णयामधील बाब (अ) २ अन्वये आपल्या संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारची परीक्षा घेण्यापुर्वी संबंधीत जिल्हयाच्या मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती निवारण प्राधिकरण यांचेशी विचारविनीमय करण्यात यावा.

**सहपत्र**:- वरीलप्रमाणे शासन निर्णय

**(डॉ. राम निबुदे)**
**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

प्रत:- 1. मा. जिल्हाधिकारी, नागपूर/भंडारा/गोंदीया/ वर्धा/ गडचिरोली/ चंद्रपूर यांना माहितीकरीता मानार्थ सादर.
2. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीकरीता मानार्थ सादर.